R.2396
D/1/12/07

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाच्या लातूर येथील उपकेंद्रास शिक्षक व शिक्षकेतर पदे मंजूरीबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक आरएमयु १३०५/(१२०)/(१४९/०५)/विशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
दिनांक : १३ नोव्हेंबर, २००७

वाचा : १) कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे क्र.कुलगुरु / निधी २००५-०६/४७३, दि. १९.१.२००७ चे पत्र
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.आरएमयु १३०५/(१४९/०५)/विशि-२, दिनांक २९.३. २००७

प्रस्तावना :- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड हे जिल्हे येतात. विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी लातूर येथे उपकेंद्र सुरु करणे व उपकेंद्रात तीन शैक्षणिक संकुले सुरु करण्याचे प्रस्तावित होते. विद्यापीठाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार लातूर उपकेंद्र निर्मिती आणि तीन शैक्षणिक संकुले आणि त्यातील १२ अभ्यासक्रम सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार विद्यापीठातील उपकेंद्र निर्मिती व उपकेंद्राच्या पूर्वतयारीसाठी अनुक्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये रु. ३.०० कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. विद्यापीठाच्या उपकेंद्रात सुरु करावयाच्या तीन शैक्षणिक संकुलासाठी (१२ अभ्यासक्रमासह) आवश्यक शिक्षक, शिक्षकेतर पदांचा प्रस्ताव विद्यापीठाकडून प्राप्त झाला. विद्यापीठाच्या प्रस्तावास वित्त विभाग, संयुक्त सचिव समिती, उच्चस्तरीय सचिव समिती व मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त करुन घेण्यांत आली. आता या शासन निर्णयान्वये लातूर उपकेंद्राच्या निर्मितीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. तसेच उपकेंद्रासाठी खालील नमूद ३ शैक्षणिक संकुले व त्यातील १२ अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

| संकुलाचे नांव | संकुलात सुरु करावयाचे अभ्यासक्रम |
|---|---|
| १) स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी | अ) केमिकल टेक्नॉलॉजी, ब) इंडस्ट्रीयल बायोटेचनॉलॉजी, क) एनर्जी स्टडीज, ड) बायो इन्फर्मेटीक्स |
| २) स्कूल ऑफ मॅनेजमेंट | अ) डिझास्टर मॅनेजमेंट, ब) वॉटर मॅनेजमेंट क) इंटर नॅशनल फायनान्स ॲण्ड बॅकींग, ड) मेटिऑरॉलॉजी (meteorology) ॲण्ड वेदर फोरकास्टींग |
| ३) स्कूल ऑफ सोशल सायन्सेस | अ) ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट ब) इकॉनॉमिक्स क) पॉलिटीकल सायन्स, ड) रुरल डेव्हलपमेंट |

D/B(U)D

ESH

for n-n 1/12

S/Academic हा विषय ऐजेंडेच्या विषय म्हणून विद्यापरिषदेसमोर ठेवावा अशी सूचना/आदेश मा. कुलगुरूंनी केली आहे
1/12/07

उपरोक्त अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी १२ शिक्षकीय व २४ शिक्षकेतर पदे मंजूर करण्यात येत त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

शिक्षकीय पदांचा तपशिल

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी | प्राध्यापक | १ | १६४००-२२४०० |
| | | प्रपाठक | २ | १२०००-१६५०० |
| | | अधिव्याख्याता | १ | ८०००-१३५०० |
| १. | स्कूल ऑफ मॅनेजमेंट | प्राध्यापक | १ | १६४००-२२४०० |
| | | प्रपाठक | २ | १२०००-१६५०० |
| | | अधिव्याख्याता | १ | ८०००-१३५०० |
| १. | स्कूल ऑफ सोशल सायन्स | प्राध्यापक | १ | १६४००-२२४०० |
| | | प्रपाठक | २ | १२०००-१६५०० |
| | | अधिव्याख्याता | १ | ८०००-१३५०० |
| | एकूण पदे | | १२ | |

शिक्षकेतर पदांचा तपशिल

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | उपकुलसचिव | १ | १०६५०-१५८५० |
| २. | सहाय्यक कुलसचिव | १ | ८०००-१३५०० |
| ३. | सहाय्यक ग्रंथपाल | १ | ८०००-१३५०० |
| ४. | स्वीय सहाय्यक | १ | ७४५०-११५०० |
| ५. | अधिक्षक | १ | ६५००-१०५०० |
| ६. | लघुलेखक (उच्चश्रेणी) | १ | ६५००-१०५०० |
| ७. | लेखापाल | १ | ५५००-९००० |
| ८. | वरिष्ठ लिपिक | ३ | ४०००-६००० |
| ९. | कनिष्ठ लिपिक | ६ | ३०५०-४५९० |
| १०. | रोखपाल | १ | ४०००-६००० |
| ११. | वाहनचालक | १ | ३०५०-४५९० |
| १२. | ग्रंथालय परिचर / परिचर | ६ | ३०५०-४५९० |
| | एकूण पदे | २४ | |

सदर पदे भरण्याबाबतची कार्यवाही विद्यापीठाने त्वरित सुरु करावी. उपरोक्त नमूद पदांच्या वेतन व भत्याचा एकूण अंदाजित वार्षिक खर्च रु. ५७,७३,०००/- इतका आहे. या पदांचा सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील खर्च संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी " मागणी क्र. डब्ल्यू -२ , २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०३ - विद्यापीठीय व उच्च शिक्षण - विद्यापीठांना सहाय्य, योजनांतर्गत योजना (००) (०१) सर्वसाधारण शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदाने, ३१ सहाय्यक अनुदाने (२२०२ ०६८३) " या लेखाशीर्षाखालील मंजूर तरतूदीतून भागविण्यांत यावा व सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी या पदांच्या वेतनाच्या खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी करावी.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३६६/२००७ / व्यय-५, दि. २०.६.२००७ च्या सहमतीनंतर निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in येथे उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००७११२३१५४७३६००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सं. अ. बागेश्वर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत.

१) राज्यपाल तथा कुलपती यांचे उपसचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड
४) कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
५) कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ मुंबई / नागपूर
७) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२ मुंबई / नागपूर
८) जिल्हा कोषागार अधिकार पुणे
९) नियोजन विभाग
१०) वित्त विभाग / व्यय ५ / अर्थसंकल्प कक्ष
११) अवर सचिव , कार्यासन साशि-१, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय
१२) निवड नस्ती विशि-२